**बँक ऑफ महाराष्ट्र तिसऱ्या तिमाहीत १३९ % वाढ नोंदवून अव्वल , तर तिसऱ्या तिमाहीत सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील बँकांच्या नफ्यात ६५ % वाढ**

सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील बँकाच्या तिमाही आकडेवारीनुसार पुणे येथे मुख्यालय असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने डिसेंबर २०२२ मध्ये समाप्त तिसऱ्या तिमाहीत आपल्या नफ्यात सर्वात जास्त १३९ %
( रुपये ७७५ कोटी ) वाढ नोंदविली आहे..

**१२ फेब्रुवारी २०२३ पी टी आय**

डिसेंबर २०२२ मध्ये समाप्त तिसऱ्या तिमाहीत सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील बँकांनी आपल्या नफ्यात ६५ % ( रु २९१७५ कोटी ) एवढी जोमदार वाढ नोंदविली असून नफ्यातील टक्केवारीचा विचार करता बँक ऑफ महाराष्ट्राने अव्वल क्रमांक प्राप्त केला आहे.

सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील बँकाच्या तिमाही आकडेवारीनुसार पुणे येथे मुख्यालय असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने डिसेंबर २०२२ मध्य समाप्त तिसऱ्या तिमाहीत आपल्या नफ्यात सर्वात जास्त १३९ % ( रुपये ७७५ कोटी ) वाढ नोंदविली

बँक ऑफ महाराष्ट्र नंतर कलकत्ता स्थित युको बँकेने मागील आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीच्या तुलनेत या वर्षीच्या तिमाहीत आपल्या नफ्यात ११० % ( रुपये ६५३ कोटी ) वाढ नोंदवून दुसरा क्रमांक पटकावला आहे.

युनियन बँक ऑफ इंडिया व इंडियन बँक या नफ्यामध्ये १००% पेक्षा जास्त वाढ नोंदविणाऱ्या अन्य बँका आहेत. .

डिसेंबर तिमाहीत मुंबई स्थित युनियन बँक ऑफ इंडियाने आपल्या नफ्यात १०७ % वाढ ( रु २२४५ कोटी ) वाढ नोंदवली आहे. तर चेन्नई स्थित इंडियन बँकेने आपल्या नफ्यात १०२ % वाढ ( रु १३९६ कोटी ) वाढ नोंदवली आहे..

मागील वर्षाच्या याच कालावधीतील रु १७७२९ कोटी नफ्याच्या तुलनेत या वर्षीच्या तिसऱ्या तिमाहीत सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील १२ बँकांनी मिळून ६५ % वाढीसह रु २९१७५ कोटी नफा नोंदविला आहे

मागील वित्तीय वर्षाच्या ९ महिन्यांच्या रु ४८९८३ कोटी नफ्याच्या तुलनेत चालू वित्तीय वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यात सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील बँकांनी ४३ % वाढ नोंदवून रु ७०१६६ कोटी नफा नोंदविला आहे. सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील बँकांनी पहिल्या तिमाहीत रु १५३०६ कोटी , सप्टेंबर तिमाहीत रु २५६८५ कोटी व डिसेंबर तिमाहीत रु २९१७५ कोटी एवढा नफा नोंदविला आहे.

टक्केवारीचा विचार केल्यास मागील वित्तीय वर्षाच्या तुलनेत या वर्षीच्या पहिल्या तिमाहीत वाढ ९ % , दुसऱ्या तिमाहीत ५० % तर तिसऱ्या तिमाहीत ६५ % वाढ नोंदविली आहे.

.

दिनांक ३१ डिसेंबर २०२२ रोजीच्या स्थिती नुसार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये बँक ऑफ महाराष्ट्राचे भांडवली पर्याप्तता प्रमाण सर्वात जास्त म्हणजे १७.५३ % असून कॅनरा बँकेने

१६.७२ % व इंडियन बँकेने १५.७४ % भांडवल पर्याप्तता प्रमाण साध्य करून अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे.

एकूण व निव्वळ अनुत्पादक कर्जाचे प्रमाण भारतीय स्टेट बँक व बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये सगळ्यात कमी आहे. दिनांक ३१ डिसेंबर २०२२ रोजी बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये व भारतीय स्टेट बँक एकूण कर्जापैकी अनुत्पादक कर्जाचे प्रमाण अनुक्रमे २.९४ व ३.१४ आहे. तर निव्वळ अनुत्पादक कर्जाचे प्रमाण अनुक्रमे ०.४७ % व ०.७७ % आहे.